(15)

(54) (54)

## महाराष्ट्र शासन

क्रमांक :मजनिप्रा-२०११/(२/२०११)/जसं(आस्था)

जलसंपदा विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७.१.२०११.

प्रति,

सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद.
महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक.
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
सर्व अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग

| आवक नोंद म.सं.सं.(वि.गु.)नाशिक-४. | |
|---|---|
| अधी.अभि. | 9/2019 |
| उप.अभि. | [illegible] |
| स.लि. | 9/2019 |
| टेबल | [illegible] |
| आ.क्र. | 27E |
| दि. | 20.9.19 |

विषय : **महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण(सुधारणा) अध्यादेश, २०११.**

उपरोक्त विषयाबाबतच्या मराठी व इंग्रजी अध्यादेशाच्या प्रती माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत. सदर अध्यादेश आपल्या अधिनस्त कार्यालयांच्या निर्देशनास आणावा, ही विनंती.

(सही)
(सु.श.यादव)
शासनाचे कक्ष अधिकारी

का.नि. २ २०.९.१९

P.H.3.

प्रत:-

मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
मुख्य अभियंता (पा/जसं/दवप्र/कृपातंल) व सहसचिव यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सह सचिव (सेवा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
आंतर वित्त सल्लागार व सहसचिव यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
उप सचिव (लाक्षेवि/सिं.व्य./जसं/मोप्र १/२/लपा/निवसं) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
अवर सचिव (लाक्षेवि/सिं.व्य./जसं/मोप्र १/२/लपा/निवसं) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी (संगणक कक्ष) यांना विनंती की, विषयधीन अध्यादेश जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.
जसं (आस्थापना) कार्यासन संग्रहार्थ.

G:\Meeting 5.1.11.doc

कार्यालय
अधीक्षक अभियंता,
म. सं. सं. (वि. गु.)
नाशिक - ४.

क्रमांक/धा-५/ [illegible]/प्रशा/१०८
दि.२०.९.१९ कार्यकारी अभियंता सं.नि.वि. [illegible] क्र १, २, ३ व ४
प्रत [illegible] नाशिक यांना कृपया माहितीसाठव.
सोबत: मराठी व इंग्रजी अध्यादेश [illegible]

(सही)
उप विभागीय अधिकारी (प्रशा)
अधीक्षक अभियंता (वि.गु.) यांचे करिता
मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, नाशिक-४

(16)

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३८] मंगळवार, जानेवारी ११, २०११/पौष २१, शके १९३२ [ पृष्ठे ७, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.—महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ यात सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. | १-७ |

जलसंपदा विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ जानेवारी २०११.

## MAHARASHTRA ORDINANCE No. II OF 2011.

*AN ORDINANCE*

TO AMEND THE MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ACT, 2005.

**सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.**

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ यात सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

१९७६ चा महा. ३८. ज्याअर्थी, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ सिंचनाच्या व सिंचनेतर प्रयोजनांसाठी पाणी-पुरवठ्याचे विनियमन करतो ;

२००५ चा महा. १८. २००५ चा महा. २३. **आणि ज्याअर्थी,** राज्याने, सन् २००५ मध्ये, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ आणि महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ हे दोन स्वतंत्र अधिनियम अधिनियमित केले ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ आणि महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ यांमध्ये देखील त्याखालील प्राधिकरणांद्वारे जलसंपत्तीचे नियमन करणे व प्रशुल्क निर्धारित करणे याबाबत तरतुदी करण्यात आल्या आहेत ; २००५ चा महा. १८. १९७६ चा महा. ३८.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ हा महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ निरसित करीत नाही ; २००५ चा महा. १८. १९७६ चा महा. ३८.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ याच्या कलम ३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक ८ जून, २००५ पासून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना केली आहे ; २००५ चा महा. १८.

**आणि ज्याअर्थी,** पाण्याच्या वाटपाच्या संबंधात राज्य शासन व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या भूमिका स्पष्ट करणे इष्ट होते ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१० (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे), हा दिनांक १७ सप्टेंबर, २०१० रोजी प्रख्यापित केला ; २०१० चा महा. अध्या. ११.

**आणि ज्याअर्थी,** दिनांक १ डिसेंबर, २०१० रोजी राज्य विधानमंडळाचे पुन्हा अधिवेशन भरल्यानंतर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्याकरिता, महाराष्ट्र विधानसभेमध्ये सन २०१० चे विधानसभा विधेयक क्रमांक ७५ हे दिनांक १ डिसेंबर, २०१० रोजी मांडण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक १६ डिसेंबर, २०१० रोजी राज्य विधानमंडळाच्या अधिवेशनाची सत्रसमाप्ती झाल्यामुळे, उक्त विधेयक राज्य विधानमंडळाकडून संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे पुन्हा अधिवेशन भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर म्हणजेच दिनांक ११ जानेवारी, २०११ नंतर, उक्त अध्यादेश अंमलात असल्याचे बंद होईल ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू राहणे इष्ट आहे असे वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०११ असे म्हणावे.

(२) हे कलम दिनांक १७ सप्टेंबर, २०१० रोजी अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल व कलमे २ ते ६ ही, दिनांक ८ जून, २००५ रोजी अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल.

२००५ चा महा. १८.

२. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २ ची सुधारणा.

(एक) खंड (ट) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ट-१) " उच्चाधिकार समिती " याचा अर्थ, शासन निर्णय, पाटबंधारे विभाग, क्रमांक संकीर्ण-१००१/(१५४-०१)/सिं.व्य. (धो.), दिनांक २१ जानेवारी, २००३, याअन्वये, राज्य शासनाने घटित केलेली समिती, असा आहे ;";

(दोन) खंड (प) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(प-१) " क्षेत्रीय वाटप " याचा अर्थ, राज्य शासनाने, जलसंपत्ती प्रकल्पामध्ये वापराच्या विविध प्रवर्गांना केलेले वाटप, असा आहे;".

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये,— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ११ ची सुधारणा.

(१) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क) कलम १६क अन्वये क्षेत्रीय वाटप केल्यानंतर, विहित करण्यात येईल अशा अटी व शर्तीवर, नदी-खोरे अभिकरणाकडून वापराच्या प्रत्येक प्रवर्गामधील पाणी वापराच्या हक्कांचे वितरण करण्याकरिता निकष निर्धारित करणे ;";

(२) खंड (ढ) वगळण्यात येईल ;

(३) खंड (ण) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ण) प्रमाण आणि प्रकार या दोन्ही दृष्टींनी केलेला पाण्याचा प्रत्यक्ष वापर हा संबंधित नदी-खोरे अभिकरणाने वापराच्या विविध प्रवर्गांना दिलेल्या पाणी वापराच्या हक्काला अनुसरून असल्याचे सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, मोजमाप व संनियंत्रण यामार्फत, पाणीवापर अंमलबजावणी करणारी यंत्रणा प्रस्थापित करणे आणि तिचे नियमन करणे ;".

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मधील, पोट-कलम (१) मध्ये, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम १४ ची सुधारणा.

" परंतु आणखी असे की, कलम ११ अन्वये पाणी वापराच्या हक्कांचे वितरण निर्धारित केल्यानंतर आणि पाण्याची हक्कदारी देण्याचे निकष निर्धारित केल्यानंतरच केवळ, या कलमान्वये पाण्याची हक्कदारी आवश्यक असेल.".

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १६ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ यामध्ये कलम १६क समाविष्ट करणे.

शासनाकडून क्षेत्रीय वाटप.

"१६क. (१) कलम ११ मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, क्षेत्रीय वाटप निर्धारित करील :

परंतु, अशा प्रकारे निर्धारित केलेल्या क्षेत्रीय वाटपाचे सामान्यपणे तीन वर्षापेक्षा कमी होणार नाही अशा कालांतरांनी पुनर्विलोकन करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, क्षेत्रीय वाटप निर्धारित केल्यानंतर, प्राधिकरण कलम ११ च्या खंड (क) अन्वये, पाणी वापराच्या हक्कांचे वितरण करण्याकरिता निकष निर्धारित करील.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ यामध्ये कलमे ३१क, ३१ख आणि ३१ग समाविष्ट करणे.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

कार्यक्षेत्र निश्चित केल्यानंतर पाण्याची हक्कदारी लागू होणे.

"३१क. या अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, "पाण्याची हक्कदारी" ही संज्ञा, महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये कार्यक्षेत्र निश्चित करण्यासह ज्या क्षेत्रांमध्ये सर्व संबद्ध तरतुदींचे अनुपालन केले असेल अशा क्षेत्रांनाच लागू होईल. २००५ चा महा. २३.

**स्पष्टीकरण.**— महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ ज्या क्षेत्रांना लागू होत नाही अशा क्षेत्रांच्या संबंधात त्या अधिनियमाचे कलम ७८ लागू व परिणामकारक असेल. २००५ चा महा. २३.

परवानगी, वाटप, इत्यादी चालू राहणे.

३१ख. या अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये अथवा कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा किंवा प्राधिकरणाचा कोणताही आदेश, न्यायनिर्णय किंवा हुकूमनामा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदींना अनुसरून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०११ याच्या कलम १ च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी म्हणजेच ; दिनांक १७ सप्टेंबर, २०१० पूर्वी, उच्चाधिकार समितीने किंवा नदी-खोरे अभिकरणाने अथवा राज्य शासनाने ज्यांना परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी दिली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा गटास ती, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार दिली असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार, ती चालू राहील आणि अशा व्यक्तीस किंवा पाणी वापर गटास पाणी घेण्यासाठी परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी नव्याने मिळविण्याची आवश्यकता असणार नाही. २०११ चा महा. अध्या. २.

विवक्षित दावा किंवा कार्यवाही, इत्यादीस प्रतिबंध.

३१ग. या अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०११ याच्या कलम १ च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दिनांक १७ सप्टेंबर, २०१० पूर्वी, उच्चाधिकार समितीने किंवा नदी-खोरे अभिकरणाने अथवा राज्य शासनाने दिलेली परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी ही वैध असेल आणि नेहमीकरिता वैध असल्याचे मानण्यात २०११ चा महा. अध्या. २.

येईल आणि तद्नुसार, कोणत्याही न्यायालयासमोर, न्यायाधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर, पाणी घेण्यासाठी अशी परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी यांना आक्षेप घेणारा कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही आणि महाराष्ट्र
२००५ चा महा. १८. जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ अन्वये आवश्यक असलेली कोणतीही परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी मिळविण्यात आलेली नाही या कारणावरून, असा कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही. ".

२०१० चा महा. अध्या. ११. ७. (१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१० हा, याद्वारे, मागे घेण्यात येत आहे. सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ मागे घेऊन निरसित करणे व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे अध्यादेश मागे घेण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाद्वारे करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही किंवा यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

(21)

## निवेदन.

महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ (१९७६ चा महा. ३८) हा सिंचनाच्या व सिंचनेतर प्रयोजनार्थ पाणीपुरवठ्याचे, विनियमन करतो. सन २००५ मध्ये राज्याने, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (२००५ चा महा. १८) आणि महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ (२००५ चा महा. २३) हे दोन स्वतंत्र अधिनियम अधिनियमित केले आहेत. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम " असा करण्यात आला आहे), तसेच महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६, यांत उक्त अधिनियमांखालील प्राधिकरणांद्वारे जलसंपत्तीचे नियमन करणे व प्रशुल्क निर्धारित करणे यांबाबत तरतुदी करण्यात आल्या आहेत. राज्य शासनाने, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, याच्या कलम ३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक ८ जून २००५ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण स्थापित केले आहे.

२. महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम " असा करण्यात आला आहे), हा सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन आणि तत्संबंधित आणि तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करतो. महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियमाचे कलम ७७ अशी तरतूद करते की, महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियमाच्या प्रारंभास या अधिनियमान्वये असलेल्या क्षेत्रांच्या संबंधात, सिंचनाच्या व सिंचनेतर प्रयोजनार्थ पाणीपुरवठा करण्याच्या संबंधात महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याच्या काही तरतुदी निरसित करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल. महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियमाच्या कलम ७८ मध्ये अशी तरतूद आहे की, त्या अधिनियमाद्वारे विनिर्दिष्टपणे निरसित न केलेल्या महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ च्या तरतुदी अंमलात राहतील आणि त्या सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन याखालील क्षेत्रांना लागू राहतील. सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापनांखालील क्षेत्राच्या बाबतीत त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींवर अधिभावी असण्याची तरतूद, महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम याचे कलम ७९ करते. महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम याचे कलम ६५ अशी तरतूद करते की, महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियमाची व त्याखालील नियमांची अंमलबजावणी करताना महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमामधील कलमे ११ ते १४ व कलम २२ यांतील तरतुदी लागू असतील.

३. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम आणि महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम यांच्या सुसंवादी रचनेवरून असे दिसून येत आहे की, महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियमाच्या कलम ५ अन्वये कार्यक्षेत्र निश्चिती जोपर्यंत करण्यात येत नाही आणि विविध उपाययोजना हाती घेण्यात येत नाहीत तोपर्यंत, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याच्या तरतुदी आणि विविध शासन निर्णय लागू असणे चालू राहील. महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम या अन्वये कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आल्यानंतर आणि विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्यानंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमाच्या तरतुदी लागू होतील. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने व उच्चाधिकार समितीने आणि नदी-खोरे अभिकरणांनी परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी दिली आहे. तथापि, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमाद्वारे महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ निरसित करण्यात आलेला नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेता, पाण्याच्या वाटपासंबंधी, राज्य शासन आणि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या भूमिकांच्या संदर्भात काही शंका उपस्थित झाल्या होत्या. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम याच्या तरतुदी, महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियमान्वये पूर्व आवश्यकतांचे अनुपालन केलेले आहे किंवा कसे हे लक्षात न घेता, त्या एकाचवेळी लागू असल्याचे मानल्यास त्यामुळे उक्त दोन्ही कायद्यांमध्ये हानिकारक संघर्ष होईल आणि पाण्याचे वाटप करताना गोंधळ निर्माण होईल व ते करणे अशक्य होईल.

४. पिण्याचे पाणी, औद्योगिक वापर व सिंचन यांसारख्या वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गांमध्ये पाण्याचे क्षेत्रीय वाटप करणे हे नेहमीच राज्य शासनाच्या अधिकारकक्षेत येते आणि असे वाटप केल्यानंतरच केवळ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, प्रत्येक प्रवर्गामध्ये पाणी वापराच्या हक्काचे वितरण करण्यासाठी निकष निर्धारित करील. यादृष्टीने, हे स्पष्ट करणे आवश्यक झाले होते की, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमाचे भविष्यलक्षी परिणाम होतील आणि महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियमाच्या कलम ५ अन्वये कार्यक्षेत्र निश्चित करण्यासह विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्यानंतरच केवळ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमाच्या तरतुदी त्या क्षेत्रांना लागू होतील. हे देखील स्पष्ट करणे आवश्यक झाले होते की, जेथे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम लागू होण्यापूर्वी, उच्चाधिकार समितीने किंवा नदी-खोरे अभिकरणाने अथवा राज्य शासनाने पाणी वापर गटाला परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी दिली आहे तेथे जोपर्यंत सर्व संबंधित कायद्यांमधील प्रक्रियेस अनुसरून त्यात फेरफार करण्यात येत नाहीत तोपर्यंत अशा पाणी वापर गटाला नव्याने परवानगी, मंजुरी, वाटप, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी मिळविण्याची आवश्यकता असणार नाही. म्हणून, यासंबंधात महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमामध्ये सुधारणा करण्याकरिता अध्यादेश प्रख्यापित करून ही वस्तुस्थिती तात्काळ स्पष्ट करणे इष्ट झाले होते. म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१० (सन २०१० चा महा. अध्या. ११) हा, दिनांक १७ सप्टेंबर, २०१० रोजी प्रख्यापित केला होता.

५. त्यानंतर, राज्य विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनामध्ये, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी, दिनांक १ डिसेंबर, २०१० रोजी, सन २०१० चे विधानसभा विधेयक क्रमांक ७५, हे महाराष्ट्र विधानसभेमध्ये मांडण्यात आले होते. तथापि, दिनांक १६ डिसेंबर २०१० रोजी राज्य विधानमंडळाची सत्रसमाप्ती झाल्यामुळे उक्त विधेयक राज्य विधानमंडळाकडून संमत होऊ शकले नाही. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे, दिनांक ११ जानेवारी, २०११ नंतर म्हणजेच राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद होईल.

६. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१० (सन २०१० चा महा. अध्या. ११) याच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी, तात्काळ कार्यवाही करणे, जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती, अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे, आणि म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ११ जानेवारी २०११.

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ए. बा. पाटील,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

(23)

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ५३ ] मंगळवार, जानेवारी ११, २०११/पौष २१, शके १९३२ [ पृष्ठे ७, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक २

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment and Continuance) Ordinance, 2011 (Mah. Ord. II of 2011), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment and Continuance) Ordinance, 2011 (Mah. Ord. II of 2011), published under the authority of the Governor.].

---

**WATER RESOURCES DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 11th January 2011.

**MAHARASHTRA ORDINANCE No. II OF 2011.**

*AN ORDINANCE*

*to amend the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005.*

Mah. XXXVIII of 1976. WHEREAS the Maharashtra Irrigation Act, 1976 regulates the supply of water for irrigation and non-irrigation purposes ;

Mah. XVIII of 2005. Mah. XXIII of 2005. AND WHEREAS the State has, in the year 2005 enacted two separate Acts, *viz.* the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 and the Maharashtra Management of Irrigation Systems by Farmers Act, 2005 ;

AND WHEREAS the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005, and also the Maharashtra Irrigation Act, 1976, provide for the regulation of water resources and determination of tariff by the authorities thereunder ; Mah. XVIII of 2005. Mah. XXXVIII of 1976.

AND WHEREAS the said Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005, does not repeal the Maharashtra Irrigation Act, 1976 ; Mah. XVIII of 2005. Mah. XXXVIII of 1976.

AND WHEREAS the Government of Maharashtra has, in exercise of the powers conferred by section 3 of the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005, established, with effect from the 8th June 2005, the Maharashtra Water Resources Regulatory Authority ; Mah. XVIII of 2005.

AND WHEREAS it was expedient to clarify the roles of the State Government and the Maharashtra Water Resources Regulatory Authority, in relation to the allocation of water ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra promulgated the Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment) Ordinance, 2010, on the 17th September 2010 (hereinafter referred to as "the said Ordinance"); Mah. Ord. XI of 2010.

AND WHEREAS upon the re-assembly of the State Legislature on the 1st December 2010, a Bill for converting the said Ordinance into an Act of the State Legislature was introduced in the Maharashtra Legislative Assembly as L. A. Bill No. LXXV of 2010, on the 1st December 2010;

AND WHEREAS the said Bill could not be passed by the State Legislature, as the session of the State Legislature was prorogued on the 16th December 2010;

AND WHEREAS as provided by article 213 (2) (*a*) of the Constitution of India, the said Ordinance shall cease to operate after the 11th January 2011, the date on which the period of six weeks from the date of re-assembly of the State Legislature expires;

AND WHEREAS it is considered expedient to continue the operation of the provisions of the said Ordinance;

AND WHEREAS both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to continue the operation of the provisions of the said Ordinance, for the purposes hereinafter appearing;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

1. (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment and Continuance) Ordinance, 2011.

(*2*) This section shall be deemed to have come into force on the 17th September 2010 and sections 2 to 6 shall be deemed to have come into force on the 8th June 2005.

Mah. XVIII of 2005.

2. In section 2 of the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (hereinafter referred to as "the principal Act"),— Amendment of section 2 of Mah. XVIII of 2005.

(*i*) after clause (*k*), the following clause shall be inserted, namely :—

"(*k-1*) "High Power Committee" means the committee constituted by the State Government under the Government Resolution, Irrigation Department, No. Misc. 1001/(154-01)/I.M.-(P), dated the 21st January 2003 ;";

(*ii*) after clause (*u*), the following clause shall be inserted, namely :—

"(*u-1*) "sectoral allocation" means the allocation made in a water resources project by the State Government to the various Categories of Use ;".

3. In section 11 of the principal Act,— Amendment of section 11 of Mah. XVIII of 2005.

(*1*) for clause (*a*), the following clause shall be substituted, namely :—

"(*a*) to determine the criteria for the distribution of Entitlements by the River Basin Agencies, within each Category of Use, on such terms and conditions as may be prescribed, after sectoral allocation is made under section 16A ;";

(*2*) clause (*n*) shall be deleted ;

(*3*) for clause (*o*), the following clause shall be substituted, namely :—

"(*o*) to establish a system of enforcement of the Entitlements issued by the concerned River Basin Agency to various Categories of Use and its regulation, through measurement and monitoring, with a view to ensure that the actual use of water, both in quantity and type of use, are in compliance with the Entitlements issued ;".

4. In section 14 of the principal Act, in sub-section (*1*), after the existing proviso, the following proviso shall be added, namely :— Amendment of section 14 of Mah. XVIII of 2005.

"Provided further that, the Entitlement under this section shall be required only after the distribution of Entitlement has been determined and the criteria for issuance of Entitlement has been laid under section 11.".

5. After section 16 of the principal Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of section 16A in Mah. XVIII of 2005.

"16A. (*1*) Notwithstanding anything contained in section 11 or any other provisions of this Act or in any other law for the time being in force, the State Government shall determine the sectoral allocation : Sectoral allocation by State Government.

Provided that, sectoral allocation so determined shall ordinarily be reviewed at such intervals of not less than three years.

(*2*) After the sectoral allocation, as provided in sub-section (*1*) is determined, the Authority shall determine the criteria for the distribution of Entitlements under clause (*a*) of section 11.".

(26)

Insertion of sections 31A, 31B and 31C in Mah. XVIII of 2005.

6. After section 31 of the principal Act, the following sections shall be inserted, namely :—

Entitlement to apply only after delineation.

"31A. Notwithstanding anything contained in this Act or any other law for the time being in force, the term "Entitlement" shall apply only to such areas where compliance of all relevant provisions including delineation under the Maharashtra Management of Irrigation Systems by Farmers Act, 2005 is made. Mah. XXIII of 2005.

*Explanation.*—In respect of the areas where the Maharashtra Management of Irrigation Systems by Farmers Act, 2005, has not become applicable, section 78 of that Act shall apply and be effective. Mah. XXIII of 2005.

Permission, allocation, etc., to continue.

31B. Notwithstanding anything contained in this Act or in any other law for the time being in force, or in any order, judgement or decree of any court, tribunal or authority, any person or Water User Entity to whom a permission, allocation, sanction, authorization or Entitlement of water has been granted by the High Power Committee or the River Basin Agency or the State Government, prior to the 17th September 2010, being the date of commencement of section 1 of the Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment and Continuance) Ordinance, 2011, shall be deemed to have been granted, in accordance with the provisions of this Act and accordingly the same shall continue and no such person or Water User Entity shall be required to obtain fresh permission, allocation, sanction, authorization or Entitlement to draw water. Mah. Ord. II of 2011.

Bar of certain suits or proceedings, etc.

31C. Notwithstanding anything contained in this Act or in any other law for the time being in force, a permission, allocation, sanction, authorization or Entitlement of water, granted by the High Power Committee or the River Basin Agency or the State Government prior to the 17th September 2010, being the date of commencement of section 1 of the Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment and Continuance) Ordinance, 2011, shall be valid and shall be deemed always to have been valid and accordingly no suit, prosecution or any other legal proceedings shall lie, challenging such permission, allocation, sanction, authorization or Entitlement to draw water, before any court, tribunal or other authority and no such suit, prosecution or other legal proceedings shall lie or continue on the ground that any permission, allocation, sanction, authorization or Entitlement, as required under this Act, has not been obtained.". Mah. Ord. II of 2011.

Repeal of Mah. Ord. XI of 2010 by withdrawal and saving.

7. (*1*) The Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment) Ordinance, 2010, is hereby withdrawn. Mah. Ord. XI of 2010.

(*2*) Notwithstanding such withdrawal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Ordinance.

STATEMENT

The Maharashtra Irrigation Act, 1976 (Mah. XXXVIII of 1976) regulates the supply of water for irrigation and non-irrigation purposes. In the year 2005, the State has enacted two separate Acts, *viz*. the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (Mah. XVIII of 2005) and the Maharashtra Management of Irrigation Systems by Farmers Act, 2005 (Mah. XXIII of 2005). The Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (hereinafter referred to as "the MWRRA Act") and also the Maharashtra Irrigation Act, 1976, provide for the regulation of water resources and determination of tariff by the authorities thereunder. The State Government, in exercise of the powers conferred by section 3 of the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005, established, with effect from the 8th June 2005, the Maharashtra Water Resources Regulatory Authority.

2. The Maharashtra Management of Irrigation Systems by Farmers Act, 2005 (hereinafter referred to as "the MMISF Act") provides for management of irrigation systems by farmers and matters connected therewith or incidental thereto. Section 77 of the MMISF Act provides that, on commencement of the MMISF Act, in relation to the areas under that Act, certain provisions of the Maharashtra Irrigation Act, 1976, relating to supply of water for irrigation and non-irrigation purposes shall be deemed to have been repealed. Section 78 of the MMISF Act provides that, the provisions of the Maharashtra Irrigation Act, 1976, which has not been specifically repealed shall remain in force and apply to the areas under the Management of Irrigation Systems by Farmers. Section 79 of the MMISF Act provides for overriding effect over the provisions of any other law for the time being in force, in respect of the areas under the Management of Irrigation Systems by Farmers. Section 65 of the MMISF Act provides that the provisions of sections 11 to 14 and section 22 of the MWRRA Act shall apply in implementing the provisions of the MMISF Act and the rules made thereunder.

3. A harmonious construction of the MWRRA Act and the MMISF Act makes it apparent that until the delineation of the areas under section 5 of the MMISF Act has been effected and various steps have been undertaken, the provisions of the Maharashtra Irrigation Act, 1976 and various Government Resolutions would continue to apply and after delineation of the areas and taking of various steps, the provisions of the MWRRA Act become applicable. It is in this background, the State Government and the High Power Committee and the River Basin Agencies have granted permissions, allocations, sanctions, authorizations or

Entitlements of water. However, in view of the fact that, the MWRRA Act does not repeal the Maharashtra Irrigation Act, 1976, certain doubts were raised regarding the roles of the State Government and the Maharashtra Water Resources Regulatory Authority, in relation to the allocation of water. The interpretation that, irrespective of whether the necessary pre-requisites under the MMISF Act have been complied with, the provisions of the MWRRA Act will apply simultaneously, would lead to destructive conflict of both the said laws and would make allocation of water chaotic and impossible.

4. The sectoral allocation of water between different categories of users such as drinking, industrial and irrigation was always intended to be within the purview of the State Government and only after such allocation, the Maharashtra Water Resources Regulatory Authority would determine the criteria for the distribution of the Entitlements within each category. In view of this, it was necessary to clarify that, the MWRRA Act, would have prospective effect and it is only after the various steps including delineation of the areas under section 5 of the MMISF Act have been taken, the provisions of the MWRRA Act would apply to those areas. It was also necessary to clarify that where the permission, allocation, sanction, authorization or Entitlement of water has been granted by the High Power Committee or the River Basin Agency or the State Government to a Water Users Entity, before the MWRRA Act becoming applicable, such Entity would not be required to obtain the permission, allocation, sanction, authorization or Entitlement of water afresh, unless the same is altered by following the process under all relevant laws. It was, therefore, expedient to clarify the position immediately by amending the MWRRA Act, by promulgating an Ordinance in this matter. The Governor of Maharashtra therefore, promulgated the Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment) Ordinance, 2010 (Mah.Ord. XI of 2010), on the 17th September 2010.

5. Thereafter, a Bill for converting the said Ordinance into an Act of the State Legislature was introduced in the Winter session of the Maharashtra Legislative Assembly as L. A. Bill No. LXXV of 2010, on the 1st December 2010. However, the said Bill could not be passed by the State Legislature, as the session of the State Legislature was prorogued on the 16th December 2010. As provided by article 213 (2) (*a*) of the Constitution of India, the said Ordinance would cease to operate after the 11th January 2011, being the expiry of six weeks from the re-assembly of the State Legislature.

(29)

6. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to continue the operation of the provisions of the Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment) Ordinance, 2010 (Mah. Ord. XI of 2010), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 11th January 2011.

K. SANKARANARAYANAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

E. B. PATIL,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.